# ग्रामीण महिलांचे आर्थिक सबलीकरण : एक आढावा

**प्रा. डॉ. अषोक बापूराव देवकर**

**अर्थषास्त्र विभाग प्रमुख, भगवान महाविद्यालय आश्टी ता. आश्टी. जि. बीड**

**गोशवारा :.**

भारतासारख्या विकसनषील देषामध्ये लोकसंख्येच्या बाबतीत महिलांचा जवळजवळ निम्मा वाटा आहे. त्यामुळे त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहाबाहेर ठेवणे अयोग्य आणि आहेत अहितकारक ठरेल. देषातील ही निम्मी लोकसंख्या अडाणी, अज्ञानी आणि अषिक्षितपणाच्या गर्तेतून बाहेर काढून देषातील समस्त महिलांना सत्ता, संपत्ती आणि संधीची समानता देऊन विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे ही काळाची गरज बनली आहे. महिला आर्थिक सबलीकरणामध्ये भारत जागतिक पातळीवर खूपच मागे आहे. महिलांच्या आर्थिक सबलीकरणामध्ये एकूण 128 देषामध्ये भारताचा क्रमांक 115 वा लागतो. दरवर्शी जवळपास साडेपाच कोटी महिलांचा भारतात कामासाठी उपलब्ध असलेल्या मनुश्यबळात समावेष होतो. भारतीय पुरूशाच्या तुलनेत महिलांचा एकूण जीडीपी मधील वाटा जवळपास 27 प्रतिषन इतका आहे.

देषातील ग्रामीण भागातील महिलांकडे पाहण्याच्या दृश्टिकोण हा गरिब, अज्ञानी, अषिक्षित, अंधश्रद्धा आणि दडपषाहीखाली जीवन जगणारी असा घेतला जातो. त्याचबरोबर त्यांच्याकडे कौषल्याचे प्रमाण कमी असल्यामूळे षहरी भागातील महिलांच्या तुलनेत विकास झालेल्या दिसत नाही. तसेच ग्रामीण भागातील महिलांमध्ये षिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामूळे मालमत्ता आणि व्यवसायाची मालकी त्यांच्याकडे कमी प्रमाणात असल्याचे दिसते. ग्रामीण भागातील महिला हया असंघटित आहेत. त्याच्यांमध्ये प्रतिनिधित्व करण्याची क्षमता कमी असल्याचे दिसते. घरगुती निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यामध्ये अल्प आहे. ग्रामीण भागातील महिला हया सक्षम व्हावात या दृश्टिकोणातून षासकीय पातळीवर विविध उपाययोजना करण्याचा प्रयत्न चालू आहे. ग्रामीण भारताच्या विकासासाठी ग्रामीण महिलांचे आर्थिक सक्षमीकरण महत्त्वाचे आहे.

**बीजसंज्ञाः.**

ग्रामीण महिला, महिला सबलीकरण, महिलांचे आर्थिक सबलीकरण.

**प्रास्तावानाः.**

विकसनषील देषाचा विकास आणि महिलांचा विकास यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या 121 कोटी इतकी होती. त्यापैकी महिलांची संख्या ही 58 कोटी 64 लाख इतकी आहे. एकूण लोकसंख्येमध्ये पुरूशाचे प्रमाण 52 प्रतिषत आणि महिलांचे प्रमाण 48 प्रतिषत इतके आहे. म्हणजेच महिलांची संख्या जवळजवळ निम्मी आहे. महिला सबलीकरणासाठी केंद्रषासन आणि राज्यषासन सातत्याने प्रयत्न करत आहेत. महिलांना त्यांचा हक्क आणि अधिकार याची जाणीव करून देणे आवष्यक असते.महिलांना त्यांचे मुलभूत हक्क व अधिकार प्राप्त करून देण्यासाठी व त्यांना संरक्षण देण्यासाठी अनेक घटनात्मक कायदे तयार करण्यात आलेले आहेत. महिलांमध्ये षिक्षणाचे प्रमाण वाढविणे, महिलांना आर्थिकदृश्टया स्वांवलबी बनविणे, आर्थिक व्यवहार आणि संपत्तीमध्ये सहभागी करूण घेणे, अषा स्वरूपांची अनेक उदिद्श्टे महिला सबलीकरणासाठी आवष्यक आहेत. भारत सरकारने 2001 हे वर्श 'महिला सबलीकरण वर्श' म्हणून जाहीर केलेले आहे. त्यानिमित्ताने महिलांच्या आर्थिक पारिस्थितीचा आढावा घेण्यात आला. भारतातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांनी केलेली सकारात्मक प्रगती केंद्रस्थानी, ठेवून, तत्कालीन पंतप्रधानांनी, 'स्त्रीषक्ती

पुरस्कार' देण्यास सुरूवात केली. 1975 हे वर्श संयुक्त राश्ट्रसंघाने ; 'आंतरराश्ट्रीय महिला वर्श' म्हणून घोशित केले. 8 मार्च हा दिवस जगभरात 'जागतिक महिला दिन' म्हणून दरवर्शी साजरा केला जातो. या सर्व गोश्टीमागे महिलांचे सबलीकरण व्हावे हा एकमेव उददे्ष आहे. भारतीय राज्यधटनेने बहाल केलेला 'समानतेचा मुलभूत हक्क' हा महिलांच्या विकासाचा भक्कम पाया आहे. सरकारने 1990 साली राश्ट्रीय स्तरावर 'राश्ट्रीय महिला आयोगा'ची स्थापना केली. या षोधनिबंधामध्ये ग्रामीण महिलांचे आर्थिक सबलिकरण हा मुख्य विशय अभ्यासण्यात आलेला आहे.

**महिला सबलीकरणाचा अर्थः.**

महिला सबलीकरण म्हणजे तिची दुर्बलता नश्ट करणारी, तिच्या षारीरिक, मानसिक आणि बौद्धिक क्षमतेची आणि प्रामुख्याने, तिच्या स्वत्वाची, अस्तित्वाची, अस्मितेची जाणीव व जागरूकता तिच्यात निर्माण करून, त्या दृश्टीने स्वयंविकासासाठी तिला प्रवृत करणारी एक प्रकिया होय. या दृश्टीने तिचा सर्वांगिण विकास, प्रगती आणि विविध कार्य क्षेत्रातील तिचा समान सहभाग, तसेच, न्याय्य वागणूकीबाबत किंवा संपूर्ण समता व न्याय्य निर्मितीच्या दृश्टीने विष्लेशण करणारी संकल्पना, हे 'स्त्री सबलीकरणाचे' प्रमुख उदिद्श्ट आहे.

किरण देवेंद्र म्हणतात की, ''स्त्री सबलीकरणाचा अर्थ, स्त्री ही आर्थिकदृश्टया स्वतंत्र, स्वंयनिर्भर व स्वावलंबी असणे होय. तिला स्वतःबददल सकारात्मक दृश्टिकोण असावा, जेणे करून कोणत्याही विपरित परिस्थितीला तिला एकटीला सामोरे जाता येईल. विकास कार्यात सहभागी होण्यास ती पात्र ठरेल. निर्णय निर्धारत प्रक्रियेत ती सहभागी होऊ षकेल. या करिता 'षिक्षण' हा सबलीकरणासाठी महत्त्वाची भूमिका वटविणारा एक घटक आहे.

भारत सरकारच्या कन्ट्री रिपोर्टनुसार, ''सबलीकरण म्हणजे बळजबरीने दुर्बल ठेवण्याच्या अवस्थेकडून षक्तीकडील वाटचाल होय. याद्वारे, स्त्रियांमध्ये स्वतःबददलची सकारात्मक प्रतिमा निर्माण होते व त्यांच्या क्षमतेत वाढ होते.'' सबलीकरणाविशयी मत माडतांना संदिपकुमार चौधरी म्हणतात. की, ''सषक्तीकरण म्हणजे स्त्रियांना स्वावलंबी बनविणे, असा ढोबळ मानाने अर्थ काढता येईल. सामाजिक दृश्टिकोनातून स्त्रियांवर अन्याय सुरू आहे. या अन्यायाची भरपाई करणे म्हणजे महिलांचे सषक्तीकरण होय.'' तसेच ''स्त्री सबलीकरण म्हणजे स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी स्त्रीला आर्थिक, सामाजिक, नैतिक, सांस्कृतिक दृश्टिने सुदृढ करणे.''

स्त्री सबलीकरणाचा खरा अर्थ, स्त्रीच्या बुद्धिमत्तेला सुप्त षक्तीला किंवा कार्यक्षमतांना, सामर्थ्याला, धारणक्षमतेला फुलविणे, तसेच स्वतःची खरी ओळख, विचारस्वातंत्र्य, आभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि प्रत्यक्ष कृती, तसेच तिच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्राला हाताळण्याचे सामर्थ्य तिच्यात निर्माण करणे होय. स्त्रियांना केवळ त्यांच्या क्षमतेची जाणीव करून न देता, त्यासोबतच, त्यांना आवष्यक त्या संधी, सुविधा आणि बाहय व आंतरिक वातावरण निर्माण करून देणे, त्यांच्या जन्मजात गुणांचा यथायोग्य वापर करून, त्यांच्यात आत्मविष्वास व आत्मनिर्थरता निर्माण करून देणे, हे स्त्री सबलीकरणासाठी अतिषय महत्त्वाचे आहे. तिच्याविरूदध होणाऱ्या अन्याय व षोशणविरूद्ध आवाज उठविणे व त्याविरूद्ध संघर्श निर्माण करण्याची क्षमता तिच्यात निर्माण करणे, म्हणजे तिचे सबलीकरण करणे होय.

**ग्रामीण महिलाः.**

देषातील एकूण लोकसंख्येच्या जवळपास अर्धी लोकसंख्या ही महिलांची आहे. निष्चितच जागतिकीकरणामुळे षहरी महिलांना षिक्षण आणि रोजगारांच्या संधी उपलब्ध झाल्या आणि पुरूशांच्या बरोबरीने सर्व हक्क विकसित करण्यास व त्यांच्या ताब्यात घेण्यास त्यांना मदत झाली. परंतु ग्रामीण भागातील महिला अजूनही षिक्षण, सामाजिक उर्जा, आर्थिक

पाष्वभूमी, राजकीय बाबी इत्यादी बाबतीत मागासलेल्या आहेत. त्यामुळेच देषाच्या विकासकार्यात ग्रामीण भागातील स्त्रियांना समाविश्ट केले जात नाही. ग्रामीण भागातील महिला मुलांचे पालनपोशण आणि संगोपनामध्ये व्यस्त असतात. कौटिबिंक कामकाजामधून त्यांना फारसा वेळ मिळत नाही.

**ग्रामीण महिलांचे सबलीकरणः.**

ग्रामीण महिलांना त्यांचे मूळ ज्ञान, कौषल्य आणि लघु व्यवसाय निर्मितीसाठी सक्षम बनविणे आवष्यक आहे. ग्रामीण भागातील महिलांनी छोटे छोटे उद्योग सुरू करून त्या उद्योगाचे रूपांतर मोठया उद्योगामध्ये झालेले अनेक उदाहरणे आहेत. ग्रामीण महिलांचे कौटुंबिक आणि समाजातील योगदानामध्ये सिंहाचा वाटा आहे. परंतु असे असले तरी; त्यांना विकासाच्या संधीमध्ये अतिषय अल्प वाटा मिळतो. बहुतेक वेळा त्यांना षिक्षण चांगल्या नौकऱ्या, राजकीय व्यवस्थेत सहभाग आणि चांगली आरोग्य सेवा, निर्णय घेण्यापासून वगळले जाते. त्याषिवाय, त्यांना षरीरिक, मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अडथळयांचा सामना करावा लागतो. की जे त्यांच्या सक्षमीकरणास अडचण निर्माण करतात. भारतातील नियोजनकर्त्यांनी स्त्री व पुरूश यांच्यामधील दरी कमी करण्याकरिता रणनीती ठरविली. 1950 मध्ये या कार्याक्रमाचा दृश्टिकोण 'कल्याण' हा होता, तर 1970 च्या सुमारास 'विकास' हा झाला व 1980 पासून 'सबलीकरण' हा दृश्टिकोण झाला. सबलीकरण म्हणजे एखादयाला सामर्थ्यवान करणे. असमतोलाच्या बाबतीत स्वतः निर्णय घेण्यासाठी परिपक्व बनविणे किंवा तयार करणे होय. षिक्षणातील सहभाग, आर्थिक स्वातंत्र्य, गतिमानता, सार्वजानिक ठिकाणी भाश्य करणे, हक्कांबाबत जागरूकता व अमंलबजावणी व राजकीय सहभाग इत्यादी गोश्टीतील निर्णय घेण्यासाठी स्त्रीला सक्षम करणे म्हणजे सबलीकरण होय. महिला सबलीकरण हे केवळ सत्तेचे वाटप, पुर्नवाटप किंवा सहभागापुरतेच मर्यादित नसून त्यामध्ये सामाजिक, आर्थिक व संस्थात्मक व्यवस्थेतील बदल होणे अपेक्षित आहे. सबलीकरण ही बहुविध, बहूआयामी व बहुपातळया असलेली संकल्पना आहे. सबलीकरण्याच्या संकल्पनेमध्ये सत्तेचे न्याय वाटप अपेक्षित आहे.

**महिलांचे आर्थिक सबलीकरणः.**

भारतातील ग्रामीण भागातील बहुसंख्य महिला घरकामात गुंतलेल्या आहेत. कोणत्याही व्यक्तीला समाजामध्ये माणूस म्हणून जगावयाचे असेल तर आर्थिक स्वावलंबन आवष्यक आहे. स्त्रीयांच्या आर्थिक स्थिती बाबत मार्कस म्हणतात की, ''उत्क्रांतीच्या टप्प्यावरून पूढे सरकत असतांना, आणि रानटी अवस्थेतून सांस्कृतिक आवस्थेपर्यंत येताना उत्पादन साधने विकसित होत गेली. त्यानंतर खाजगी मालमत्ता ही संकल्पना रूढ झाली. आणि संपत्तीवरील इतर हक्क पुरूशांकडे गेले. एन्जेल्स म्हणतो की, ''जसजषी संपत्ती वाढली तसतसा पुरूशांचा कौटुंबिक आणि सामाजिक दर्जा स्त्रीयांच्या तुलनेत उंचावला, यातुन स्त्रींच्या लेखी दुय्यम दर्जा प्राप्त झाला.'' वरिल संदर्भानुसार वेतनासंबंधी भेदभाव, स्वयंरोजगार, अर्थसहाय्याचा अभाव, विना वेतन काम व बेरोजगारी, कुटीर उद्योगात मालकी हक्क नाही; अषा अनेक कारणांमुळे स्त्रीचे आर्थिक स्थान पुरूशापेक्षा दुय्यम राहिलेले दिसले. महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन आर्थिक दृश्टया महिला सक्षमीकरण करणे हा या प्रक्रियेचा उददेष आहे. महिलांना आर्थिक अधिकार मिळवून देणे, उत्पादन प्रक्रियेत सहभागी करून घेणे या गोश्टी केल्या तरच राश्ट्राचा विकास होईल.

महिलांच्या आर्थिक सुरक्षेसाठी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेत अनेक तरतुदी आहेत. राश्ट्रीय ग्रामीण उपजीविका कार्यक्रम म्हणजे एनआरएलएम मध्ये ग्रामीण महिलांना आर्थिक सुरक्षा व सक्षमीकरणाची संधी दिलेली आहे. राश्ट्रीय महिला कोश योजनेत गरीब महिलांना नियमित निधी दिला जातो. त्यांना उद्योग व स्वमदत गटांसाठी प्रोत्साहन दिले जाते. महिला ई–हाट योजनाही सुरू केली असून त्यात महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन दिले जाते. इंटरनेट उद्योग

व्यवस्था डिजिटल इंडियात उपलब्ध केली असून त्यातही महिलांना उद्योजकतेत प्राधान्य व आर्थिक विकासात त्यांचा समावेष करण्याचा प्रयत्न आहे. प्रधानमंत्री जनधन योजनेत लाखो महिलांचे पहिले बॅंक खाते सुरू करण्यात आले; त्यामधून गरिबी व दारिद्र्याचे दृश्ट्रचक्र संपण्याची अपेक्षा आहे. भारतात जवळजवळ 47 प्रतिषत महिलांची बॅंक खाती उपलब्ध आहेत. प्रधानमंत्री कौषल्य विकास योजनेत दारिद्र्यातून बाहेर पडण्यासाठी रोजगार उपलब्ध करून दिले जातात. त्यामध्ये महिलांना मोठयाप्रमाणात संधी आहे. सुकन्या समृदधी योजना 'बेटी बचाव बेटी पढावो' अंतर्गत राबवली असून त्यात जुन 2019 मध्ये 86 लाख खाती सुरू करण्यात आली.

ग्रामीण महिला या दारिद्र्य रेशेखाली आणि अत्यंत गरिबीच्या परीस्थितीत जीवन जगत असतात. ग्रामीण महिलांच्या एकत्रिकरणासाठी आणि सेवा एकत्रित करण्यासाठी, त्यांच्या क्षमता वाढविण्यासाठी आवष्यक असलेल्या आधारभूत उपायांसह अनेक आर्थिक आणि सामाजिक पर्यायांची ऑफर देवून त्यांच्यासाठी पावले उचलली गेली. स्त्रिया, व्यापार आणि उत्पादनासाठी पतपुरवठयात प्रवेष करण्यासाठी अतित्वात असलेल्या सुक्ष्म पतयंत्रणा आणि बचत गटासारख्या सुक्ष्मवित्त संस्थांची नवीन स्थापना आणि बळकटीकरण आधिच कार्यरत आहे. अस्तित्वात असलेल्या वित्तीय संस्था आणि बॅंकाद्वारे कर्जाचा पुरेसा प्रवाह सुनिष्चित व्हावा यासाठी इतर आधारभूत उपाययोजना केल्या जातील, जेणेकरून दारिद्र्य रेशखालील सर्व महिलांना सहज पतपुरवठा होऊ षकेल. अषा प्रक्रियेत त्यांचा सहभाग संस्थागत करून स्थूल अर्थषास्त्रीय आणि सामाजिक धोरणांची आखणी करून अंमलबजावणी करतांना महिलांच्या दृश्टीकोनाचा समावेष केला जाईल. उत्पादक आणि कामगार म्हणून सामाजिक आर्थिक विकासासाठी त्यांचे योगदान औपचारिक आणि अनौपचारिक क्षेत्रात ओळखले जाईल आणि नौकरी आणि तिच्या कामकाजाच्या परिस्थितीषी संबंधित योग्य धोरणे तयार केली जातील हे लक्षात घेतले जाते; की जागतिकीकरणाने महिलांच्या समानतेचे उदिद्श्ट साध्य करण्यासाठी नवीन आव्हाने सादर केली आहेत; त्यातील लौंगिकपरिणामाचे पद्धतषीरपणे संपूर्ण मुल्यांकन केले गेले नाही. तथापि महिला व बाल विकास विभागाने सुरू केलेल्या सूक्ष्म स्तरीय अभ्यासानुसार हे स्पश्ट आहे; की रोजगार आणि रोजगाराच्या गुणवत्तेसाठी नुतनीकरण धोरणांची गरज आहे. वाढत्या जागतिकीकरणाचे फायदे असमान पद्धत्तीने वाटले गेले आहेत. त्यामुळे मोठयाप्रमाणात आर्थिक असमानता, दारिद्र्य, स्त्रीत्व अनेकदा ढासळणारी परिस्थती आणि विषेशता अनौपचारिक अर्थव्यवस्था आणि ग्रामीण भागात असुरक्षित कामकाजाच्या वातावरणामुळे लौंगिक असमानता वाढली आहे. महिलांची क्षमता वाढविण्यासाठी आणि त्यांना नकारात्मक सामाजिक आणि आर्थिक परिणामांची पूर्तता करण्यासाठी सषक्तीरकण करण्यासाठी रणनीती आखल्या गेल्या ज्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमधून येऊ षकतात.

कृशी व त्यासंबंधित क्षेत्रातील महिलांची निर्णायक भूमिका पाहता, उत्पादक या नात्याने प्रषिक्षण, विस्तार आणि विविध कार्यक्रमाचे फायदे त्यांच्या संख्येच्या प्रमाणात पोहोचतील याची खात्री करण्यासाठी एकत्र प्रयत्न केले जातील.

महिलांना मृदा सवंर्धन, सामाजिक वनीकरण, दुग्धाविकास आणि इतर व्यवसायात बागायनी, लहान पशुपालन, कुक्कुटपालनासह मत्स्यपालन यासारख्या षेतीषी संबंधित असलेल्या इतर व्यवसायांचे प्रषिक्षण देण्याचे कार्यक्रम कृशी क्षेत्रातील महिला कामगांराच्या फायदयासाठी त्यांचा विस्तार केला जाईल.

**समारोप :.**

कोणत्याही देषातील समुदायाचा आर्थिक विकास सुनिष्चित करण्यासाठी महिला सषक्तीकरण आवष्यक आहे. देषातील महिलांना मुख्य प्रवाहात आणणे आणि राश्ट्रीय विकासाच्या प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढविणे ही षासनाची प्रमुख चिंता आहे. सर्व प्रकारची कायदे व योजना असून ही नियोजन व विकासाच्या सरकारी योजना महिलापर्यंत पोहचण्यास अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे क्षेत्रीय स्तरावर योजनांची अमलंबजावणी होणे आवष्यक आहे. देषातील आर्थिक

पायाभूत सुविधांची उपलब्धता आणि आवष्यकता यांच्यातील व्यापक अंतर लक्षात घेऊन महिलांचे सबलीकरण होणे गरजेचे आहे.

**संदर्भः**


1. डॉ. विलास आढाव, 'महिला सबलीकरण,' प्रौढ, निरतंर षिक्षण व ज्ञानविस्तार विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठ, पुणे.
2. डॉ. संभाजी वारंगुळे पाटील, 'महिला सबलीकरणात षासनाची भूमिका,' गोल्डन रिसर्च थॉट, मार्च 2014.
3. भारत सरकार, '2011 चा जनगणना अहवाल; नवी दिल्ली 2011.
4. गीता लुथ्रा, 'महिला सबलीकरण कायद्यातील तरतुदी,' योजना, ऑक्टोबर 2018.